कला अकादमी गोवा
पणजी-गोवा
कअ/काविवि/गुरुकुल/२०१९-२०/
दि.०३/० ५/२०१९

# कृपया प्रसिध्दीसाठी

उन्कल, हुबळी-धारवाड येथील डॉ. गंगुबाई हन्गल गुरुकुल ट्रस्ट येथे गुरु-शिष्य परंपरेत हिंदुस्थानी शास्त्रीय संगीताचे (गायनाचे) शिक्षण घेऊ इच्छिणा-या इच्छुक गोमंतकीय विद्यार्थ्यांकडून कला अकादमीने विहित नमुन्यातील पूर्णरीत्या भरलेले अर्ज मागविले आहेत. सदर अर्जात इच्छुक विद्यार्थ्यांचे नाव, जन्मतारीख व वय, पूर्ण पत्ता, संपर्क दूरध्वनी क्रमांक, शैक्षणिक अर्हत्ता, संगीत क्षेत्रातील शिक्षण अथवा पात्रता, संगीत क्षेत्रातील शिक्षक अथवा गुरुचे नाव इत्यादी तपशील नमूद असलेले अर्ज सदस्य सचिव, कला अकादमी गोवा, कांपाल, पणजी-गोवा ४०३००१ या पत्यावर अथवा (kalaacademygoa@yahoo.co.in) या ईमेल पत्यावर उशिरात उशिरा १० मे २०१९ पर्यंत पाठवणे आवश्यक आहे. इच्छुक विद्यार्थ्यांच्या सोईसाठी विहित नमुन्यातील अर्ज कला अकादमीच्या कार्यक्रम व विकास विभागात उपलब्ध असून कला अकादमीची अधिकृत वेबसाईटवर (kalaacademygoa.co.in) अर्जाचा नमुना उपलब्ध आहे. आवश्यक तपशीलासह आलेल्या अर्जातून गंगुबाई हन्गल गुरुकुलात प्रवेश देण्यासाठी पात्र उमेदवारांची ऑडिशन टेस्ट (चाचणी) कला अकादमीतर्फे घेतली जाईल व त्यानंतर गुरुकुलात प्रवेशसाठी निवडक २ (दोन) विद्यार्थ्यांच्या नावांची शिफारस अकादमीतर्फे गंगुबाई हन्गल गुरुकुल ट्रस्टला केली जाणार आहे.

पात्रता निकर्षानुसार इच्छुक विद्यार्थ्यांना हिंदुस्थानी संगीताचे प्राथमिक ज्ञान असणे आवश्यक आहे. तसेच उमेदवार किमान १० इयत्ता उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. इच्छुक उमेदवारांची किमान वयोमर्यादा १५ वर्षे व कमाल वयोमर्यादा ३५ वर्षे आहे. पुरुष अथवा स्त्री अविवाहित उमेदवारांनाच प्रवेश दिला जाणार आहे. गुरुकुलातील शिक्षण घेण्याचा कालावधी किमान दोन वर्षे व जास्तीत जास्त चार वर्षे राहील. प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांना मोफत राहण्याची सोय (निवास व्यवस्था) जेवणखाण व गणवेशाच्या दोन जोडया या सुविधा उपलब्ध असतील.

कला अकादमीने इच्छुक संगीत विद्यार्थ्यांची चाचणी एक निश्चित केलेल्या तारखेस घेणार असून त्यातून निवडलेल्या विद्यार्थ्यांची शिफारस डॉ. गंगुबाई हन्गल ट्रस्टला केली जाईल यावेळी संबंधित विद्यार्थ्यांकडून त्यांच्या गायनाची ध्वनीमुद्रिका(Recording CD), फिटनेसचा वैद्यकिय दाखला व इतर आवश्यक कागदपत्रांच्या छायाप्रती अकादमीकडे सुपुर्द करणे आवश्यक आहे. अकादमीने शिफारस केलेल्या २ (दोन) विद्यार्थ्यांना गुरुकुलातील एक निवड चाचणीस सामोरे जावे लागेल व त्या निवड चाचणीतून गुरुकुलासाठी प्रवेश दिला जाईल.

तरी सर्व संबंधितानी याची नोंद घेऊन आपापले अर्ज आवश्यक तपशीलासह उशिरात उशिरा १० मे २०१९ पर्यंत कला अकादमीत दाखल करणे आवश्यक आहे असे कला अकादमीतर्फे कळविण्यात आले आहे.

(डॉ.दत्तगुरु आमोणकर)
कार्यक्रम व विकास अधिकारी

प्रति
१.गोमंतक २.नवप्रभा ३.तरुण भारत ४.पुढारी ५.गोवा दूत ६.लोकमत ७.दै.हेराल्ड

८.गोवन वार्ता,सांतईनेज,पणजी ९.आकाशवाणी पणजी केंद्र( वृत्तविभाग) १०. दै भांगरभूंय

/एसएस